REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १२ जुलै, १९४४ अंक २८

★ लटकती तलवार ! ★

गर्दन छाटली जाण्याचा संभव !

खुनी पेशव्यांना देहांत शासनाची शिक्षा फर्माविणाऱ्या रामशास्त्र्यांना पक्कें माहीत होतें कीं, आपल्या मानेवर राघोबाच्या क्रोधाची तलवार लटकत आहे. ती केव्हां आपली गर्दन छाटेल त्याचा नेम नाहीं ! पण

न्यायाकरितां—सत्याकरितां ते जिवावर उदार झाले !

शनिवार ता. ८ पासून
२ रा आठवडा ! | प्रभात ( किबे लक्ष्मी थिएटर ) पुणें

प्रभातचा प्रचंड प्रेक्षणीय ऐतिहासिक बोलपट

—रामशास्त्री—

निर्माते:—दामले—फत्तेलाल | दिग्दर्शक:—गजानन जहागीरदार

—: भूमिका :—

गजानन जहागीरदार, मीनाक्षी, ललिता पवार, गणपतराव,
मा. विठ्ठल, सुधा आपटे, अनंत मराठे, हंसा,
भागवत, मांजरेकर, मा. छोटु

आ. १०, रु. १, रु. १।, रु. १॥ ह्या दरांची तिकिटें दररोज सकाळीं १० ते १२ रिझर्व्ह केलीं जातील.



आजपासून रोज तीनही खेळ
दु. ३॥, सायं. ६॥, रा. १०
मराठी बोलपट
' रामशास्त्री '

सूचनाः—प्रेक्षकांच्या खास सोयीकरतां केवळ त्यांच्याच खास आग्रहावरून—दररोज सायंकाळीं ४ ते ५ दुसऱ्या दिवसांच्या सर्व खेळांचीं वरच्या दरांचीं तिकिटें रिझर्व्ह केलीं जातात.

पुना गे[illegible] हाउस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone
779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

## विविध माहिती

### काश्मीरचे महाराज

काश्मीरचे महाराज युद्ध मंडळाच्या बैठकीकरतां इंग्लंडला गेले होते हें प्रसिद्धच आहे. राजाच्या राज्याभिषेकाचे प्रसंगी ते पूर्वी गेले. तेव्हां त्यांनीं आपल्या बरोबर हिंदुस्थानांतून सहा मोटारी नेल्या होत्या. मोटारींवर "काश्मीर" म्हणून पाटी झळकत होती. महाराजांचें वार्षिक उत्पन्न सुमारें ४ कोटि रुपयांचें आहे. त्यांचे जवाहिर जगप्रसिद्ध आहे. पांचव्या जॉर्जच्या दरबारास ते हजर होते, तेव्हां त्यांच्या कपड्यावर चमकणाऱ्या हिऱ्यांची किंमत साडे चार कोटि रुपये होती. ज्युबिलीसाठी ते लंडनला गेले, त्या वेळीं त्यांनीं पोलोचीं ४२ घोडीं बरोबर घेतलीं. वरील माहिती ब्रिटिश वृत्तपत्रांत, महाराजांच्या इंग्लंडच्या प्रवासाचे अनुषंगानें प्रसिद्ध झाली आहे.

### ५५ वर्षांवरील अविवाहित व विधवा स्त्रिया

पंचावन वर्षांवरील अविवाहित स्त्रियांची संख्या ग्रेट ब्रिटनमध्यें ७,९०,००० भरते. पंचावन वर्षांवरील विधवांची संख्या तेथें १६,८०,००० आहे.

### एव्हरेस्ट शिखराशीं स्पर्धा !

चिनी तुर्कस्थानांतील एक पर्वत एव्हरेस्ट शिखरापेक्षा उंच आहे, असें एका अमेरिकन वैमानिकास आढळून आलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. आजवर कित्येक शिखरांनीं एव्हरेस्टचें स्थान पटकविण्याचा प्रयत्न केला, परंतु ते सर्व अयशस्वी झाले आहेत.

### हीं मुलें अधिक हुशार निपजतात

ज्यांच्या गर्भाची उन्हाळयात धारणा होते अशा मुलांपेक्षा ज्यांच्या गर्भाची धारणा हिवाळयांत होते, अशीं मुलें अधिक हुशार निपजतात, असें इंग्लंडमधील बाथ शहरांतील ३३६१ मुलांच्या संबंधीं चौकशींत आढळून आलें आहे. त्यांस भाऊ व बहिणी हींहि कमी असतात.

### स्वतःचें मार्गदर्शन स्वतःच करणारी मोटारगाडी

अमेरिकेंत निघालेल्या मोटारी सामान्य उपयोगांत येऊं शकल्या, तर मोटार ड्रायव्हरांचें प्रयोजनच उरणार नाहीं. रस्त्याच्या मध्यभागी एक पांढरी पट्टी ओढलेली असते, तिचेवर फोटो इलेक्ट्रिक सेल्स नजर ठेवतील व आपोआप मोटारीचें मार्गदर्शन करतील. मागील बाजूस आरामशीर बसून मालक एका बटनाच्या सहायानें मोटार चालवूं शकेल.

### चिनी सरकारचें नवें कर्ज

किंमतींचें नियंत्रण करणें, सरकारी खर्च भागविणें व जादा चलन खेचून घेणें, ह्यासाठीं चिनी सरकारनें ५ अब्ज डॉलर्सचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे. त्याची ३० वर्षांनीं परतफेड होईल. कर्जावरील व्याजाचा दर ६% आहे.

### अन्नविषयक बाजारभावांत वाढ

ऑगस्ट, १९३९ = १००

१० जून, १९४४ अखेरचा आठवडा २२८·४

१७ जून, १९४४ „ „ २३८·८

एका आठवड्यांत झालेल्या वरील वाढीचें कारण चहाच्या बाजारभावांत झालेली वाढ हें आहे.


# WANTED

Agents to represent Sun Life Assurance Co. Of Canada in Ahmednagar, Jalgaon, Kolhapur, Nasik & Sholapur. Excellent opportunities for capable and successful men. Full training will be given.

Apply to:—

Mr. P. V. Lad,
Unit Organizer.
Sun Life Of Canada, Laxmi Rd., POONA 2.

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं ( Vitamins ) युक्त असे
( सरकार खात्यानें मान्यता दिलेले )
टोमॅटो केचप ( गोड ) व
टोमॅटो सॉस [ तिखट व आंबट ]
आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.
रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें
बिझिनेस ऑफिस: ९१३ अ सदाशिव, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा
मैलाचा — दगड
सन १९४३ अखेर

| | |
|---|---|
| नव्या कामांत | ११० टक्के वाढ |
| चालू कामांत | १०० टक्के वाढ |
| आयुर्विमानिधींत | ८० टक्के वाढ |

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ... २१८ | भवितव्य—प्रो. हिल यांचा सल्ला. | |
| २ चलन परिषदेनें हिंदी सूचना फेटाळल्या | ... २१९ | ५ नवभारत कंपनी गुंडाळ-ण्यांत येणार... | ... २२१ |
| ३ कागद नियंत्रण हुकुमामुळें अडचणी ... | ... २२० | ६ विमा कंपन्यांवरील इन्-कमटॅक्स ... | ... २२३ |
| ४ स्फुट विचार .. | ... २२१ | ७ सहकारी विमा सोसायटी-पुढील प्रश्न ... | ... २२३ |
| हिंदी कपाशीचें युद्धोत्तर | | | |

अर्थ

बुधवार, ता. १२ जुलै, १९४४

## चलन परिषदेनें हिंदी सूचना फेटाळल्या

हिंदुस्थानची गंगाजळी लंडन येथें स्टर्लिंग चलनांत जमत आहे ती या देशाच्या उपयोगी पडेल अशी व्यवस्था करण्या-विषयींची चर्चा अलिकडे जोरांत चालली होती आणि तिचे पडसाद ब्रिटिश कॉमन्स सभेंतहि ऐकावयास आले होते. युद्धा-प्रीत्यर्थ मित्र राष्ट्रांचा खर्च हिंदुस्थानांत चालला आहे, त्यासाठी लागलेलें चलन येथील सरकारनें पुरवलें असून त्याच्या आधाराचें स्टर्लिंग इंग्लंडमध्यें जमा झालें आहे, ह्या व्यवहारांत हिंदी जनतेस महागाईच्या कारणानें किती तरी तोशीस लागली आहे हें सर्वमान्य आहे. तिचा मोबदला म्हणून नाहीं तरी निदान युद्धोत्तर काळांतील आर्थिक संवर्धनासाठीं हिंदुस्थानास त्याच्या सोयीप्रमाणें आपल्या निढळाच्या घामानें तयार झालेल्या स्टर्लिंग शिलकांचा विनियोग करण्याची योग्य संधी दिली जावी ह्या मागणीविरुद्ध ब्रिटिश धंदेवाले आणि वृत्तपत्रें ह्यांनीं कशा प्रकारचें काहूर उठवलें होतें ह्याची कल्पना आम्हीं वेळोवेळ वाचकांस करून दिली आहे. हजार पंधराशे कोटि रुपये किंमतीच्या स्टर्लिंगचें रूपांतर इतर चलनांमध्यें होण्याची मागणी हिंदुस्थाननें केल्यास ब्रिटिश चलन पद्धति आणि हुंडणावळ ह्यांचा डोलारा कोलमडल्यावाचून राहणार नाहीं ह्या भीतिनें हिंदी लोकमता-विरुद्ध इंग्लंडमध्यें वृत्तपत्रांनीं प्रचार चालविला होता आणि त्याचा परिणाम चलन परिषदेच्या कार्यक्रमावर झाला. हिंदुस्थानची मागणी अमान्य करण्याचें ब्रिटिश व अमेरिकन सरकारांनीं ठरवलें होतें आणि ती परिषदेपुढें येऊंच नये आणि आल्यास ती फेटाळून लावावी असा त्यांचा निश्चय झाला होता. तरीहि आपलें म्हणणें परिषदेपुढें मांडून शक्यतर तिचा निर्णय ह्या देशांस अनुकूल होईल असा प्रयत्न करण्याचा हिंदी प्रतिनिधींचा बेत होता. त्याप्रमाणें त्यांनीं जाग-तिक चलनबँक स्थापन व्हावयाची आहे तिच्या कक्षेंत हिंदी स्टर्लिंग शिलकांच्या विनियोगाचा व्यवहार अंतर्भूत केला जावा असें सुचवलें, पण परिषदेनें बहुमतानें ती सूचना अमान्य केली.

स्थापन व्हावयाच्या जागतिक बँकेच्या पेशांत निरनिराळ्या देशांच्या चलनांचा अंतर्भाव व्हावयाचा असून सभासद राष्ट्रांच्या जरूरीप्रमाणें त्यांस इतर राष्ट्रांवरील हुंड्या मिळावयाच्या आहेत आणि अशा रीतीनें आंतरराष्ट्रीय हुंडणावळीच्या दरांत स्थिरता राखण्याची तजवीज केली जाणार आहे. हिंदुस्थानास स्वतःच्या स्टर्लिंगच्या मोबदल्यांत डॉलर्स हुंड्या हव्या असतील तर त्या मिळण्याची सोय करण्याचें सामर्थ्य जागतिक बँकेंत रहाणार नाहीं ह्या सबबीवर हिंदी सूचना नाकारण्यांत आली आहे आणि युद्धाबाबतच्या आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी त्या बँकेवर टाकण्यांत येऊं नये असें चलन परिषदेनें ठरवलें आहे. ह्याचा अर्थ असा आहे कीं हिंदुस्थानास स्वतःच्या इच्छेप्रमाणें वाटेल त्या देशांतून माल आणून लंडनमधील आपल्या शिलकांचा उपयोग करतां येणार नाहीं आणि ह्या बाबतींत इंग्लं-डच्या आर्थिक सोयीवर अवलंबून रहावें लागेल. हिंदुस्थानांत युद्ध-समाप्तीनंतर व्हावयाच्या औद्योगिक अभिवृद्धीच्या योजना आखल्या जात आहेत त्या फलद्रूप होण्याच्या मार्गांत चलन परिषदेचा निर्णय येणार आहे असें त्या परिषदेंतले एक हिंदी प्रतिनिधि, श्री. श्रॉफ, ह्यांनीं बोलून दाखवलें आहे. जागतिक बँकेनें स्टर्लिंगच्या मोबदल्यांत निरनिराळ्या देशांचीं चलनें द्यावयाचीं नाहींत तर असल्या संस्थेचा उपयोग काय ? असा त्यांचा प्रश्न आहे. परि-षदेचा निश्चय अखेर कायम झाला तर हिंदुस्थान व इतर कांहीं देश ह्यांस जागतिक बँकेसंबंधानें कांहींच जिव्हाळा वाटणें शक्य होणार नाहीं आणि तिची उपयुक्तताहि त्या मानानें कमी होईल असेंहि त्यांनीं बजावलें आहे.

दुसरे हिंदी प्रतिनिधी, सर षण्मुखम चेट्टी, ह्यांनीं जागतिक बँकेच्या योजनेस एक उपसूचना सुचवली होती तीहि चलन-परिषदेनें फेटाळून लावली. बँकेचे मुख्य उद्देश आंतरराष्ट्रीय व्यापार सुरळीत रीतीनें चालण्यास सवलती व मदत देणें आणि निरनि-राळ्या देशांत बेकारी नष्ट होण्याविषयीं तजवीज करणें असे नमूद केलेले आहेत. संपन्न राष्ट्रांमध्यें परस्पर व्यापार चालल्यानें हिंदु-स्थान व चीन ह्यांच्यासारख्या मागासलेल्या देशांच्या औद्योगिक उन्नतीस कशी मदत होणार ? म्हणून सर षण्मुखम चेट्टी ह्यांनीं ह्या देशांचा उल्लेख करून त्यांस आवश्यक असलेल्या सहायाचा अंतर्भाव जागतिक बँकेच्या योजनेंत केला जावा असें सुचवलें होतें आणि तें अमान्य झाल्यामुळें आपली निराशा झाली आहे असें त्यांनीं बोलून दाखवलें आहे. स्वतंत्र हिंदी प्रतिनिधींनी ह्या देशांतलें लोकमत चलन परिषदेपुढें जोरानें आणि निर्भीड-पणानें मांडल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. पण पुढें काय ? असा प्रश्न येथें उद्भवतो. हिंदुस्थान सरकारनें येथील लोकांस पसंत नसलेली आणि ह्या देशाच्या आर्थिक हित-संबंधास पोषक नसलेली जागतिक बँकेची योजना अमान्य केली पाहिजे. चलन परिषदेचे ठराव आपणास बंधनकारक नाहींत आणि हिंदी विधिमंडळाच्या संमतीवांचून आपण कोणतेंहि धोरण निश्चित करणार नाहीं असें आश्वासन सरकारनें दिलें आहे. अशा स्थितींत सरकारावर हिंदी लोकमताची छाप पाडली जाणें अगत्याचें आहे. सरकारनें निवडलेल्या चलन परिषदेंतील हिंदी प्रतिनिधींनी लोकांच्या वतीनें आपला अभिप्राय स्पष्टपणानें व्यक्त केला आहे. हिंदी स्टर्लिंग शिलकांचा विनियोग इंग्लंड व हिंदुस्थान ह्यांच्या दरम्यान विचारविनिमय होऊन दोघांच्या संमतीनें केला जाण्या-चा मार्ग आतां उरला आहे. हिंदुस्थानांतील सरकार जनतेस

जबाबदार नसल्यानें त्यावर लोकमताचें प्रभावी वजन कसें पडणार आणि साम्राज्य सरकारापुढें त्याचें कितपत चालणार ह्याविषयीं शंका वाटणें स्वाभाविक आहे. पंचदशवार्षिक आर्थिक अभिवृद्धीच्या योजनेच्या कर्त्यांनीं ती फलद्रूप होण्यास राष्ट्रीय सरकार ह्या देशांत स्थापन होण्याचें अगत्य प्रतिपादिलें आहे त्याचें रहस्य येथें पटल्यावांचून रहात नाहीं.

## कागद नियंत्रण हुकुमामुळें निर्माण झालेल्या अडचणी

### मराठा चेंबरची हिंदुस्थान सरकारला तार

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, पुणें या संस्थेनें कागद नियंत्रण हुकुमाबाबत खालील आशयाची तार हिंदुस्थान सरकाराला केली आहे:—

सरकारला लागणाऱ्या कागदांत काटकसर करतां येण्यासारखी असून निरनिराळ्या नियंत्रण हुकुमान्वयें जे विविध प्रकारचे तक्ते सरकारकडे पाठवावे लागतात त्यांतील कांहीं सरकारनें न मागविले तरी चालण्यासारखें असून कांहींतील थोडाबहुत तपशील कमी करतां येण्याची शक्यता आहे. हिंदुस्थान सरकारचें माहिती खातें जीं पत्रकें प्रसृत करतें त्यांतील कांहीं प्रसृत न केलीं तरी चालण्यासारखें आहे. अशा रीतीनें काटकसर करून देशी गिरण्यांच्या उत्पादनापैकीं पन्नास टक्के कागद नागरिक जनांच्या गरजेसाठी यावा व त्याच्या जोडीला अमेरिका, इंग्लंडमधून कागदाची आयात करावी.

कागद नियंत्रण हुकुमामुळें छापखाने, प्रकाशक व स्टेशनरी कारखानदार यांचा धंदा बसणार असून शिक्षणकार्य व देशांतील इतर व्यवसाय यांची कुचंबणा होणार आहे. सबब नियंत्रण हुकुमांत पुढील दुरुस्त्या कराव्या.

कागदाच्या व्याख्येंतून स्ट्रॉबोर्ड वगळावा.

देशी कागदावर छापल्या जाणाऱ्या वृत्तपत्रांचे आकार व पृष्ठसंख्या याबाबत वृत्तपत्रीय कागदावर छापल्या जाणाऱ्या वृत्तपत्रांवर जे निर्बंध लागू आहेत ते निर्बंध लागू करावे.

डायरेक्टऱ्या, मार्गदर्शिका वगैरेसंबंधीं केलेल्या नियमांतून पंचांगें, संस्थांचे अहवाल वगळण्यांत यावेत.

छापखाने, प्रकाशक व स्टेशनरी कारखानदार यांनीं १९४३ मध्यें जितका कागद वापरला असेल तितका कागद वापरण्याची त्यांस मुभा असावी व त्यांचीं जीं कामें अर्धवट पुरीं झालीं असतील तीं दि. ३१-ऑगस्टपर्यंत पुरीं करण्यास परवानगी देण्यांत यावी.

हिस्सेरशीनें कागद वापरण्याबाबत निर्बंध दूर करण्यांत यावा.

दोन पौंडाहून अधिक वजनाचा माल मोटारनें अगर रेल्वेनें पाठवावयाचा असल्यास त्यासाठी वेष्टणाचा कागद वापरण्याची मुभा असावी.

### अन्नविषयक शैक्षणिक प्रकाशनास मदत

अन्नविषयक शैक्षणिक साहित्य प्रसिद्ध करण्यासाठी सर दोराबजी टाटा ट्रस्टनें मुंबईच्या पीपल्स प्रॉव्हिन्शिअल फूड कौन्सिलला वार्षिक दोन हजार रुपयांची ग्रँट दोन वर्षांसाठी मंजूर केली आहे.


# तीस वर्षांचे अखेरीस-

१९४३ मधील नवें काम—
एक कोटी चौदा लक्ष रुपयांहून जास्त

एकूण चालू काम—६७०८१४४९ रु.

एकूण मालमत्ता—
दोन कोटी दहा लक्ष रुपयांहून जास्त

एकूण भरपाई केलेले क्लेम—
साठ लक्ष रुपयांहून जास्त

खर्चाचें प्रमाण—शेंकडा २२·७ फक्त

रद्द विम्यांचें प्रमाण—
सर्व देशांत कमींत कमी

महाराष्ट्राच्या आद्य आणि श्रेष्ठ विमा कंपनीचें अभिनंदनीय यश.

# वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि. सातारा

शाखा : पुणें
कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

मुख्य कचेरी :
सातारा शहर.

# स्फुट विचार

## हिंदी कपाशीचें युद्धोत्तर भवितव्य

युद्धसमाप्तीनंतरच्या काळांत ग्रेट ब्रिटन, अमेरिका व रशिया ह्या राष्ट्रांच्या स्वहित-मूलक धोरणास अनुसरून जागतिक व्यापार व उद्योगधंदे ह्यांचें नियमन होणार आहे. हीं राष्ट्रें सुसंघटित, पुढारलेलीं आणि प्रबळ आहेत. ज्याप्रमाणें आज तीं युद्धांत अग्रेसर आहेत, त्याचप्रमाणें युद्ध जिंकल्यावर जागतिक पुनर्घटनेंत तीं प्रभावी रहाणार हें स्पष्ट आहे. युद्धजन्य हानी भरून काढून स्वतःचा आर्थिक संसार पुन्हां नीट थाटण्याच्या योजना हीं राष्ट्रें आखीत आहेत आणि त्यांमध्यें आपलें स्थान काय राहील हें हिंदुस्थानासारख्या देशानें पाहून स्वहिताचें संरक्षण करण्याची खबरदारी घेणें अगत्याचें आहे. हिंदी धंदेवाले ह्या प्रश्नांत लक्ष घालीत आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. तथापि हिंदी जनतेनें ह्याहिपेक्षा अधिक जागरूकपणानें वागणें आवश्यक आहे. सध्या हिंदी राजकारणाची कोंडी झाल्यानें हें लोकमत बनवण्याचें व व्यक्त करण्याचें कार्य व्हावें तसें परिणामकारक रीतीनें होत नाहीं, हें दुर्दैव होय. ह्या परिस्थितीचें द्योतक म्हणून हिंदी कपाशीच्या युद्धोत्तर भवितव्याचें उदाहरण देतां येईल. हिंदी शेतीविषयींच्या धोरणाचा विचार करण्यासाठी सिमला येथें अलीकडे त्यासंबंधांत नेमलेल्या समितीची सभा झाली. तीमध्यें सर चुनीलाल भाईचंद मेथा ह्यांनीं असें सांगितलें कीं अमेरिकेनें कापसाच्या व्यापाराचें नियमन करण्याच्या हेतूनें एक योजना आखली असून तीमध्यें प्रत्येक देशानें किती कपास पिकवावी व निर्गत करावी ह्याचा निर्णय नमूद झाला असून कापसाच्या कमाल व किमान किंमती ठरवण्याबाबत तरतूद आहे, हिंदुस्थानचें कपाशीचें मामुली उत्पन्न व निर्गत ह्यांस अनुसरून त्या योजनेंत ह्या देशास योग्य स्थान देण्यांत आलें पाहिजे ह्या आशयाचा ठराव सर चुनीलाल ह्यांनीं पुढें मांडला आणि तें धोरण समितीनें मान्य केलें असें समजतें. ही एक कपाशीची बाब झाली. अशा इतर किती तरी महत्त्वाच्या बाबी आहेत, आणि त्यांचा विचार वेळींच आणि व्यवस्थित रीतीनें केला जाणें अगत्याचें आहे. नाहींतर जागतिक योजना अंमलांत येऊन बैल गेला आणि झोपा केला असें हिंदुस्थानचें होण्याची भीति आहे. आमच्या सरकारनें नेट धरून स्वहितसंबंधाचा पाठपुरावा केला पाहिजे.

---

## प्रो. हिल ह्यांचा सल्ला

ह्या देशांत भौतिक शास्त्रांचे बाबतींतलें व औद्योगिक संशोधन आणि प्रयोगशाळा ह्यांचे संबंधांत काय सोयी आवश्यक आहेत ह्याविषयीं सूचना करण्यासाठी प्रो. हिल हिंदुस्थानांत चौकशी करून गेले आणि त्यांच्या शिफारसी लौकरच प्रसिद्ध होतील. ईस्ट इंडिया असोसिएशन ह्या नांवाच्या इंग्लंडमधील प्रसिद्ध संस्थेच्या विद्यमानें त्यांनीं नुकतेंच एक व्याख्यान दिलें, त्याचा गोषवारा इकडे आला आहे. ह्या देशांत शास्त्रीय प्रगति होण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली आणि ती न झाल्यास एका पिढीच्या आंत हिंदुस्थानाचा प्रचंड लोकसंख्या व उपासमार ह्यांचे योगानें नाश होण्याची भीति असल्याचें त्यांनीं सांगितलें. इंग्लंडच्या मानानें सातपट डॉक्टर्स, वीसपट दाया आणि सत्तरपट आरोग्य सहायकांची आवश्यकता ह्या देशांत आहे असें ते म्हणाले. सध्याप्रमाणें हिंदी लोकसंख्या वाढत गेल्यास एका पिढीचे आंत येथें सत्तर कोटी लोक होतील आणि त्यांच्या चरितार्थास सध्याच्या मानानें तिप्पट अन्नाचा पुरवठा करावा लागेल. ह्याकरितां नियोजनात्मक पद्धतीनें आर्थिक प्रगति घडवून आणणें आवश्यक असून तत्प्रीत्यर्थ हिंदी लोकांनीं मतभेद आणि राजकीय वाद बाजूस सारून झटावें असें सुचविलें. शिक्षणाचा प्रसार, सार्वजनिक व वैयक्तिक आरोग्याची सुधारणा, शास्त्रीय व औद्योगिक संशोधनाची वाढ ह्यांच्या अगत्याविषयीं हिंदुस्थानांत मतैक्य आहे आणि ह्या सर्व बाबतींत प्रगति घडवून आणणें हाच येथील राजकीय सुधारणेचा व प्रचाराचा उद्देश आहे, ही गोष्ट प्रो. हिल यांच्या लक्षांत आलेली दिसत नाहीं. हिंदुस्थान सरकारनें आर्थिक नियोजनाचा प्रश्न हातीं घेण्यापूर्वीच हिंदी लोकमतानें त्या बाबतींत नेटानें मागणी केली होती, एवढेंच नव्हें तर योजना आखण्याचें कामहि येथें चालू झालें होतें ह्याची माहिती त्यांस नसेल असें वाटत नाहीं. जग झपाट्यानें आधुनिक पद्धतीनें पुढें चाललें असतां हिंदुस्थानास स्वस्थ राहून चालणार नाहीं ह्याची पूर्ण जाणीव हिंदी लोकांस आहे आणि ह्या दिशेनें त्यांचे प्रयत्नहि चालू आहेत. ब्रिटिश व हिंदुस्थान सरकार ह्यांनीं ह्या कामीं उत्तेजन व सहाय्य द्यावें अशी तर त्यांची स्पष्ट मागणी आहे. पंचदशवार्षिक आर्थिक अभिवर्धनाची योजना हिंदी पुढाऱ्यांनींच तयार केली आहे आणि ती फलद्रूप होण्यासाठीं आवश्यक असलेलीं साधनें व सत्ता येथील सरकारनें वापरलीं पाहिजेत असें त्यांचें म्हणणें आहे. प्रो. हिल ह्यांचें उद्दिष्ट पूर्णपणें मान्य असलेल्यांसच त्यांचा उपदेश वस्तुतः होत आहे. राजकीय मतभेद बाजूस सारून हिंदी जनतेनें आर्थिक उन्नतीच्या मार्गे लागावें हा त्यांचा सल्ला योग्य आहे, पण राजकीय सत्ता आणि आर्थिक प्रगति ह्यांचा ह्या देशांत निकट संबंध आहे ही गोष्ट त्यांनीं दृष्टीआड करून चालणार नाहीं.

---

## नवभारत विमा कं. गुंडाळण्यांत येणार

नवभारत विमा कंपनी गुंडाळण्यांत यावी, असा सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स ( वादी ) वि. नवभारत विमा कं. लि. ( प्रतिवादी ) ह्या दाव्याचा मुंबई हायकोर्टानें निवाडा केला आहे. वरील विमा कंपनी १९३२ सालीं स्थापन झाली. १९४३ सालीं सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें तिचें मूल्यमापन करवलें, ३१ जुलै १९४२ रोजीं कंपनीच्या हिशेबांत १,७५,२३० रुपयांची तूट होती, ती तूट सव्याज वाढत जाईल, कंपनीला आपली परिस्थिति सुधारतां येणें शक्य नाहीं, तेव्हां कंपनी चालू ठेवणें विमेदारांच्या हितास बाधक आहे, असें वादीचें म्हणणें होतें. कंपनीची परिस्थिति सुधारत आहे व वादीचें म्हणणें चुकीच्या तत्त्वावर आधारलेलें आहे, असें प्रतिवादी कंपनीतर्फे सांगण्यांत आलें होतें, परंतु हायकोर्टानें वरीलप्रमाणें निवाडा केला. सरकारी रोख्यांत विमा-कंपन्यांनीं सक्तीनें गुंतविण्याच्या रकमेसंबंधांत मुंबई हायकोर्टांत हिंदुस्थान सरकारविरुद्ध हिंदी विमाकंपन्यांतर्फे एक चाचणीचा दावा लावण्यांत आला होता, तो नवभारतनें प्रातिनिधिक स्वरूपांत लावला होता हें वाचकांस स्मरत असेलच.

---

### लॉर्ड कॅटो ह्यांस हिंदुस्थानचा अनुभव आहे

बँक ऑफ इंग्लंडचे नवे गव्हर्नर, लॉर्ड कॅटो, ह्यांचें वय ६५ वर्षांचें आहे. गेल्या महायुद्धानंतर सुप्रसिद्ध व्यापारी पेढी अँड्र्यू यूल आणि कंपनी ( कलकत्ता ) चे प्रमुख म्हणून त्यांनी हिंदुस्थानांत काम केलेलें आहे.

### बंगाल दुष्काळ निवारण समिति

बंगाल दुष्काळ निवारण समितीनें आपला ३१ मे अखेरचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. समितीनें जुलै १९४३ मध्यें कामास प्रारंभ केला. तिनें २७½ लक्ष रोख व १० लक्ष रुपयांची पेनजिनसी मदत मिळविली. त्यांपैकीं २२ लक्ष रुपये खर्च झाले आहेत. शेतकऱ्यांना बीं पुरवणें, कामगारांना धंद्याचीं साधनें उपलब्ध करून देणें, बुजत चाललेलीं तळीं उकरून काढणें, बांध घालणें, सूत कातण्याचीं व विणण्याचीं केंद्रें स्थापणें, इत्यादींवर ९४ हजार रुपये खर्च झाले.

### आरोप ठेवले

मुंबईमधील चर्चगेट स्टेशन जवळील एका इमारतीचें बांधकाम चालू असतांच २८ जून १९४२ रोजीं ती पडून त्यांत ५० लोक मरण पावले व कित्येक जखमी झाले. ह्या संबंधांत इंजिनिअर मि. नुराणी, कंत्राटदार मि. इंजिनिअर, सुपरव्हायझर मि. मार्लो व कॉंक्रीट सल्लागार मि. आगा ह्यांचेवर आरोप ठेवण्यांत आले असून प्रत्येकाची चौकशी स्वतंत्रपणें होणार आहे.

### क्लब ऑफ महाराष्ट्र लि.

वरील कंपनीची स्थापना कांहीं महिन्यांपूर्वी झाली, तिच्या सभासदांच्या नोंदणीस आतां प्रारंभ होत आहे. मुंबई प्रांतांत क्रिकेट, टेनिस, फुटबॉल, बॅडमिंटन, गोल्फ, आट्यापाट्या, हुतुतु वगैरे खेळांचा प्रसार करणें, हा ह्या क्लबाचा मुख्य उद्देश आहे. क्रिकेटसाठीं स्टेडियम बांधणें ही त्याच्या कार्यक्रमांची एक प्रमुख बाब आहे. क्लबाची घटना मर्यादित जबाबदारीच्या लिमिटेड कंपनीच्या स्वरूपाची आहे. कंपनी गुंडाळण्यांत आली, तर त्यांवेळच्या प्रत्येक सभासदानें १० रुपयांपर्यंत रकम कंपनीस द्यावी लागेल. कंपनी गुंडाळल्यावर देणें देऊन राहिलेली रकम पेट्रन, लाइफ मेंबर व फौंडर मेंबर ह्यांचेमध्यें सारख्या प्रमाणांत वाटली जाईल. सभासदांचे नऊ प्रकार आहेत व त्यांच्या वर्गणीप्रमाणें त्यांस हक्क व सवलती दिलेल्या आहेत. एक्झिक्युटिव्ह कमिटीच्या नेतृत्वाखालीं वर्किंग कमिटीनें व्यवस्था पहावयाची आहे. क्लबाची एवढ्या मोठ्या प्रमाणावर लिमिटेड कंपनीच्या स्वरूपांत उभारणी महाराष्ट्रांत अपूर्व आहे, ह्यांत शंका नाहीं. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे श्री. भावे व श्री. तालीम हे सेक्रेटरी म्हणून काम करीत आहेत.

### पुणें येथील सहकारी शाळा

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटतर्फे पुणें, धारवाड व अहमदाबाद येथें तीन सहकारी शाळा स्थापन झाल्या आहेत, त्यांपैकीं पुणें येथील शाळेचें उद्घाटन ता. १७ जुलै रोजीं प्रो. वामनराव काळे यांचे हस्तें होणार आहे. श्री. श्री. रा. पाळंदे, एम. ए. एलएल. बी. हे शाळेचे ऑनररी प्रिन्सिपॉल म्हणून काम पहाणार आहेत. शिक्षणाचें माध्यम मराठी आहे. अभ्यासक्रमाची माहिती व इतर तपशील पुणें सें. को. बँकेच्या कचेरींत मिळूं शकेल. शाळेंत दाखल होण्यासाठीं अर्ज येऊं लागले आहेत, असें समजतें.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

## पुणें शहर

**भांडवल :**

( ता. ३१-५-४४ रोजीं )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व खपलेलें | : | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें | : | रु. ५,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | : | रु. १,०८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | : | रु. ७५,००,००० चे वर |

—: डायरेक्टर्स :—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहनी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमुख

: शाखा :

पुणें ४, दलाल स्ट्रीट, मुंबई, जळगांव, नागपूर.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२३,००,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा :** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा :** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस ), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स :** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स :** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

## आयुर्विमा कंपन्यांवरील इनकमटॅक्स

**वेस्टर्न इंडिया विमाकंपनीचे अध्यक्ष, श्री. ल. मो. आपटे, बी. ए., एलएल. बी., ह्यांचें कंपनीच्या वार्षिक सभेंतील भाषण.**

सध्या इनकमटॅक्सच्या दरांत भरमसाट वाढ झाली आहे. सदर वाढलेल्या दराचा परिणाम इन्शुअरन्स कंपन्यांवर फारच झाला असता ही गोष्ट लक्षांत घेऊन सरकारनें विमा कंपन्यांना इनकमटॅक्स व सुपर टॅक्सची एकूण कमाल मर्यादा एक रुपयाला ६३ पै प्रमाणें यंदांच ठरवून दिली आहे. या दरानेंही इनकमटॅक्स भरणें इन्शुअरन्स कंपन्यांना जड जात असून सदर कमाल मर्यादा ४५ पै पर्यंत ठरविण्यांत यावी याकरितां शक्य ती खटपट असोसिएशनमार्फत चालू आहे. सध्याच्या परिस्थितींत येणाऱ्या मोठ्या विम्याच्या केसेसमध्यें सर्वच्या सर्व हप्त्याच्या रकमेवर विमेदारांना इनकमटॅक्सची माफी न मिळतां ती ठराविक मर्यादेपर्यंत म्हणजे विम्याच्या रकमेच्या दहा टक्के होणाऱ्या हप्त्याच्या रकमेपर्यंत मिळणार आहे. सध्यांच्या विशिष्ट परिस्थितींत व्यापारधंद्यांतील पैशाचा सर्व ओघ विम्याच्या पॉलिसी घेण्याकडेच सध्यां होत आहे असें दिसून येतें. परिस्थिति सुधारतांच ही विमाप्रवृत्ति टिकून राहील हें संभवनीय नाहीं. तरी पण या नवीन बदलामुळें खरोखरीचे विम्याचें संरक्षण मिळविण्याच्या प्रयत्नास कांहीं बाध येण्यासारखा नाहीं.

आयुर्विमा कंपनीचें उत्पन्न कर आकारणीकरितां दोन पद्धतींनीं प्रथम काढण्यांत येतें. पहिली पद्धत म्हणजे मूल्यमापनाप्रमाणें येणारें सरासरी वार्षिक उत्पन्न व दुसरी पद्धत म्हणजे हप्त्याव्यतिरिक्त एकूण उत्पन्न वजा खर्च या पद्धतीनें येणारें उत्पन्न. दुसऱ्या पद्धतींत खर्चाची कमाल मर्यादा ठरविण्यांत आली आहे. सदर मर्यादा नुकतीच वाढविण्यांत आली असून पहिल्या वर्षाच्या हप्त्यांपैकीं शेंकडा ८५ टक्के खर्चाऐवजीं आतां ९० टक्के खर्चास व रिन्युअल हप्त्यापैकीं साडेआठ ऐवजीं शेंकडा बारा टक्के खर्चास कर आकारणीकरितां परवानगी देण्यांत आली आहे. या सवलतीमुळें कर आकारणी पूर्वीपेक्षां कमी होईल असें वाटतें. तथापि इनकमटॅक्सचा वर उल्लेख केलेला दर जो सध्यां जबर आहे तो कमी होणें अगदीं जरूर आहे. तसा तो व्हावा एतदर्थ लाइफ आफिसेस असोसिएशनमार्फत प्रयत्न चालू आहेत. ते फलद्रूप झाल्यास सध्यां मिळत असलेल्या इन्व्हेस्टमेंटवरील व्याजांत थोडीफार सुधारणा होण्याची शक्यता आहे. परंतु सदर सुधारणा भरलेला इनकमटॅक्स परत मिळते वेळींच दिसेल. त्यापूर्वीं दिसणार नाहीं.

## सहकारी विमा सोसायटी पुढील प्रश्न

**मुंबई सहकारी विमा सोसायटीचे अध्यक्ष, श्री. माधवलाल भट्ट, जे. पी. ह्यांचें वार्षिक सभेंतील भाषण.**

व्याजाचा दर शक्य तेवढा कमी राखण्याचें सध्याच्या हिंदुस्थान सरकारचें धोरण आहे. विमा कायद्याच्या २७ व्या कलमांत दुरुस्ती होण्याच्या आवश्यकतेसंबंधीं आयुर्विमा कंपन्यांची असोसिएशन कसून प्रयत्न करीत आहे, परंतु ती फलदायी झालेली नाहीं. विम्याच्या सहकारी सोसायटीस वरील २७ व्या कलमाचें बंधन आहेच, ह्याशिवाय १९२५ च्या बॉंबे को. सोसायटीज ॲक्टाचें ३७ वें कलमहि तिला पाळावें लागतें. सहकारी कायद्याच्या ३७ व्या कलमाचा कडकपणा मुंबई सहकारी विमा कंपनीचे बाबतींत मुंबई सरकारनें कमी केला असला, तरी तेवढ्यानें भागत नाहीं.

हिंदी विमा कंपन्यांच्या प्रयत्नांस अखेर यश येऊन हिंदुस्थान सरकारनें विमा कंपन्यांवरील इनकमटॅक्सचा कमाल दर रुपयांत ६२३/४ पै असा निश्चित केला. म्हणजे, तो ७४ पै वरून ६२३/४ पैवर खाली आला. कंपनी कायदा व विमा कायदा ह्यांचे खालीं नोंदण्यांत आलेल्या कंपन्यांना अशा रीतीनें थोडीशी सवलत मिळाली. बॉंबे को. इन्शुअरन्स सोसायटी ही सहकारी सोसायटी असल्यानें तिला प्रथमपासूनच कांहीं विशेष सवलत आहे, ती म्हणजे व्यक्तींवर बसविण्यांत आलेला कमाल इनकमटॅक्सचा दरच तिला लागू आहे. त्यामुळें, तिचेवरील इनकमटॅक्सचा दर मात्र ५० पैवरून ५४ पैवर गेला आहे! इतर व्यापारी संस्थांच्यापेक्षा सहकारी सोसायट्यांना, त्यांचें विशिष्ट ध्येय लक्षांत घेऊन, अधिक सवलत असावी, असें मूळ धोरण आहे. ह्या दृष्टीनें सहकारी सोसायट्यांवरील इनकमटॅक्सचा दर ४५ पैवर आणणें श्रेयस्कर ठरेल.

१९२५ च्या सहकारी कायद्याच्या ३३ ( आय ) व्या कलमान्वयें, सहकारी सोसायट्या धारण करीत असलेल्या सरकारी रोख्यांवर इनकम टॅक्स माफ करण्याचा मध्यवर्ती सरकारास अधिकार आहे. हें कलम कायद्यांत घातलेलें आहे, ह्यावरून अशी माफी देण्याचा प्रसंग उपस्थित होईल, अशी स्पष्ट कल्पना त्यावेळीं होती, हें उघड आहे. बॉंबे को. इं. सोसायटीस तिचा व्यवहार, विमा कायद्याचें २७ वें कलम व सहकारी कायद्याचें ३७ वें कलम ह्यांचे दृष्टीनें आपल्या जिंदगीच्या ७०% रकम सरकारी रोख्यांतच गुंतवावी लागते. कोणत्याहि सहकारी सोसायटीस इनकमटॅक्समध्यें कांहीं माफी मिळाल्याचें आढळून येत नाहीं, परंतु ती मिळण्याची योग्य परिस्थिति आपल्या सोसायटीच्या संबंधांत आहे.


प्रगतीचें श्रेय आपणांकडे

सह्याद्रि विमा कंपनीनें १९४३ सालीं खालीलप्रमाणें काम केलें आहे.

आलेलें काम रु. २१, ४४, ४७१ | १९४२ ५ लक्ष ३ हजारानें
मंजूर काम रु. १८, ३५, ७१४ | पेक्षां २ लक्ष १० हजारानें
पूर्ण विमा काम रु. १६, १९, ७७५ | वाढ ४ लक्ष ७ हजारानें

या सर्व प्रगतीचें श्रेय कंपनीचे विमेदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी, भागीदार व हितचिंतक यांनाच आहे व त्याच्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहोत. विमा-योजना त्याचप्रमाणें एजन्सी याच कंपनीची अत्यंत आकर्षक.

नासिक — मॅनेजिंग डायरेक्टर

## जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाही, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गॅरंटेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील

## आदर्श निवासस्थान व भोजनालय

## छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.

## ★ नगर बॉंबे ट्रेडिंग कंपनी ★

विनाव, लाइमज्यूस कॉर्डीअल, ऑरेंज व लेमन स्क्वॉश, टोमॅटो सॉस, मँगो जॅम, मध, कोको, बेकिंग पावडर, सॅनिटरी टॉवेल्स, टुथ पेस्ट, टुथ ब्रश, वगैरे मालाचे स्टॉकिस्ट.

शाखा:— माणिक चौक, अहमदनगर ★ हेड ऑफिस:— पूना गेस्ट हाऊस, पुणें २

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष:—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

### महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' मांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.